# स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन: एक अभ्यास

## (Sanitation and Environmental Conservation: A Study)

**डॉ. गांधी बानायत**

सहयोगी प्राध्यापक,

समाजशास्त्र विभाग,

शिवछत्रपती महाविद्यालय,

पाचोड, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र, भारत)

**सारांश:**

*निसर्गाच्या विरोधात जाऊन आपण कोणताही विकास साधू शकत नाही. निसर्गच मनुष्याला अन्न वस्त्र निवारा देणारा एकमेव दाता आहे. परंतु मानवाने निसर्गाचे अमर्याद शोषण सुरू केले आहे. झाडांची अंदाधुंदकत्तल करणे मोठ्या प्रमाणावर जंगल तोड करून त्यावर वस्ती उभारणे, परिसर अस्वच्छ ठेवणे नदी नाल्यामध्ये प्रदूषितपाण्याचा प्रवास सोडणे यामुळे निसर्गाची अतोनात हानी होत आहे. ही हानी टाळण्यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवून पर्यावरण संतुलनराखणे काळाची गरज बनली आहे. अन्यथा भविष्यात त्याचा वाईट परिणाम मानवी जीवनावर होऊ शकतो.*

**प्रस्तावना :**

निसर्ग आणि मानवी अस्तित्व यांचा सहसंबंध अनादी काळापासून आहे. निसर्गाशिवाय मानवी जीवन अशक्य आहे, कारण निसर्गच आपल्याला अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूतगरजा पुरवतो. तथापि, आधुनिकीकरण आणि विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गाचे अमर्याद शोषण सुरू केले आहे. बेसुमार वृक्षतोड, जंगलतोड करून वस्ती उभारणे, परिसरातील अस्वच्छता आणि नदी-नाल्यांमध्ये प्रदूषित पाणी सोडणे यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. या हानीमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्यांचा थेट परिणाम मानवी जीवनावर आणि इतर सजीवांवर होत आहे.

ग्रामीण विकासात पर्यावरण समतोल राखणे हे एक मोठे आव्हान आहे, ज्याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.पृथ्वीवर नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटकांच्या परिणामामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत, ज्यांचा विपरीत परिणाम सर्व सजीवांवर होत आहे. मानवाचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि जैवविविधतेचे जतन व संवर्धन करण्यासाठी पर्यावरण स्वच्छता अत्यंत आवश्यक आहे. वसुंधरेचे ऋण फेडण्यासाठी पर्यावरण रक्षण, संवर्धन आणि स्वच्छता ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. निसर्ग हे मानव, वन्यजीव, जलचर प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांना लाभलेले एक महान वरदान आहे. म्हणूनच, या अभ्यासात स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व, त्यांच्यातील सहसंबंध आणि मानवाच्या अस्तित्वासाठी त्यांचे काय परिणाम होतात, याचा सखोल विचार केला जाईल.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

1. स्वच्छता आणि पर्यावरणाचा सहसंबंध अभ्यासणे: स्वच्छता आणि पर्यावरण यांच्यातील गुंतागुंतीचा संबंध शोधणे आणि ते एकमेकांवर कसे परिणाम करतात हे तपासणे.

2. अस्वच्छतेमुळे पर्यावरणावर होणारे परिणाम अभ्यासणे: अस्वच्छता आणि प्रदूषणाचे पर्यावरणावर होणारे नकारात्मक परिणाम, जसे की जलप्रदूषण, वायू प्रदूषण आणि मृदा प्रदूषण यांचा सखोल अभ्यास करणे.

3. पर्यावरण संवर्धनासाठी उपाययोजना करणे: पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रभावी उपाययोजना शोधणे आणि त्या कशा राबवता येतील, याचा विचार करणे.

4. मानवाला प्रदूषणाच्या परिणामांपासून वाचवणे: प्रदूषणाचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम अभ्यासणे आणि त्यापासून मानवी जीवनाचे संरक्षण कसे करता येईल, यावर प्रकाश टाकणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आलेला आहे. या आराखड्यानुसार, तथ्य संकलनासाठी विविध स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. यात प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित सर्व संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शोधपत्रिका, नियतकालिके, वर्तमानपत्रे, तसेच प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, इंटरनेटवरील विश्वसनीय माहितीचाही उपयोग करण्यात आला आहे.

**शोधन साहित्याचे पुनर्लोकन (Literature Review) :**

पर्यावरण आणि स्वच्छतेवर आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर अनेक अभ्यास झाले आहेत. या अभ्यासांमधून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

**पर्यावरणाची संकल्पना:**

वैज्ञानिक परिभाषेत पर्यावरणात वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, तापमान इत्यादी सर्वांचा समावेश होतो. पर्यावरणाचे शिलावरण, जलावरण आणि वातावरण या मुख्य वैज्ञानिक घटकांमधील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम पर्यावरण होय. सजीवांना त्यांच्या जीवन संघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवूनघ्यावे लागते (लक्ष्मणशास्त्री जोशी, १९७६). पर्यावरणाचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

**पर्यावरणीय समस्या :**

विकासाच्या नावाखाली पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेप वाढणे, जैवविविधतेचा ऱ्हास, हवामान बदल, जागतिक तापमानवाढ यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या सोडवण्यासाठी युनायटेड नेशन्स एन्व्हरमेंट प्रोग्राम (UNEP) ची स्थापना करण्यात आली, ज्यामध्ये जागतिक तापमानवाढीमुळे पृथ्वीवरील पारिस्थितिकीय तंत्रावर विपरीत परिणाम होऊन हवामान बदलाची समस्या निर्माण होऊ शकते, यावर भर देण्यात आला आहे.

**आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक उपक्रम:**

पर्यावरण रक्षण आणि संवर्धन व्हावे यासाठी ५ जून १९७२ रोजी स्वीडनमधील स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये १३० देशांनी प्रतिनिधित्व केले होते. या परिषदेत पर्यावरण विषयक चर्चा होऊन पर्यावरण हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला. ५ जून हा दिवस १९७४ पासून जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

'फक्त एक पृथ्वी' हे २०२२ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे घोषवाक्य होते.

**भारतातील स्वच्छता मोहिमा:**

भारतात स्वच्छता मोहिमेची सुरुवात संत गाडगे महाराजांनी केली, ज्यांनी स्वतः हातात खराटा घेऊन कृतीतून स्वच्छतेचा मंत्र जगाला दिला. त्याचप्रमाणे, संत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीते' मध्ये स्वच्छतेचा उपदेश केला (संत तुकडोजी महाराज, २००४). भारतात १९५४ ला पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण भागासाठी स्वच्छता कार्यक्रम सुरू केले गेले. १९८१ च्या जनगणनेनुसार भारतात स्वच्छतेचे प्रमाण फक्त १% इतके होते. भारत सरकारने १९८६ ला केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (CRPS) सुरू केले. १९९९ ला ग्रामीण स्वच्छतेसाठी आयोगाची स्थापना करण्यात आली. नंतर २०१२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी 'निर्मल भारत अभियान' सुरू केले. २ ऑक्टोबर २०१४ ला महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत अभियाना'ची सुरुवात केली (महात्मा गांधी, १९९७).

वरील संदर्भ स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या ऐतिहासिक आणि वर्तमान स्थितीची सखोल माहिती देतात, ज्यामुळे या संशोधनासाठी एक मजबूत पाया तयार होतो.

**सैद्धांतिक दृष्टिकोन :**

प्रस्तुत संशोधनात मानवी-पर्यावरण आंतरक्रिया (Human-Environment Interaction) सिद्धांताचा अवलंब करण्यात आला आहे. हा सिद्धांत मानव आणि त्याच्या सभोवतालचे पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंधांवरलक्ष केंद्रित करतो. या सिद्धांतानुसार, मानव पर्यावरणाचा एक भाग असून, तो पर्यावरणावर प्रभाव टाकतो आणि पर्यावरणही मानवाच्या जीवनावर परिणाम करते. मानवी विकासाच्या नावाखाली पर्यावरणात वाढलेला हस्तक्षेप, जैवविविधतेचा ऱ्हास, हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या समस्या मानवी-पर्यावरण आंतरक्रियेतील असंतुलनामुळे निर्माण झाल्या आहेत. याशिवाय, शाश्वत विकास (Sustainable Development) संकल्पनाही या संशोधनाचा एक महत्त्वाचा सैद्धांतिक आधार आहे. शाश्वत विकासाचा अर्थ असा आहे की, सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांची पूर्तता करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करणे. याचा अर्थ असा की, आर्थिक विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण यांमध्ये समतोल राखणे आवश्यक आहे. प्रदूषण कमी करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे, वृक्षारोपण करणे आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे हे शाश्वत विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत.

**चर्चा आणि विश्लेषण :**

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन हे एकमेकांशी जवळून जोडलेले आहेत. जेव्हा परिसर स्वच्छ असतो, तेव्हा पर्यावरणाची गुणवत्ता सुधारते आणि मानवी जीवनावर सकारात्मक परिणाम होतो.

**स्वच्छतेचे महत्त्व:**

प्रत्येक व्यक्तीला स्वच्छतेमध्ये आणि निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे आवडते. आपल्या आजूबाजूला असलेले वृक्ष असंख्य गोष्टी प्रदान करतात. ते वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि आपल्याला जीवनावश्यक असलेला ऑक्सिजन प्रदान करतात. वृक्ष पाऊस पाडण्यासाठी आणि पर्यावरण संतुलनराखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

**प्रदूषणाचे परिणाम:**

जलप्रदूषणआणि वायू प्रदूषणयामुळे पर्यावरणाचे संतुलनबिघडत आहे. याचा परिणाम नैसर्गिक बदलांमध्ये दिसून येतो, जसे की

ओझोनचा स्तर कमी होणे आणि जागतिक तापमानवाढ यांसारख्या समस्या भेडसावत आहेत. मानवाने निर्माण केलेले नवीन तंत्रज्ञान दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे. नैसर्गिक हवा, पाणी आणि माती ज्याप्रकारे प्रदूषितहोत आहे, त्यावर असे वाटते की एक दिवस पर्यावरणाचे मोठे नुकसान होऊ शकते.

**मानवी आरोग्यावर परिणाम:**

रासायनिक खतांमुळे जमिनीची सुपीकता नष्ट होते आणि तेच रासायनिक घटक दररोज अन्नामधून आपल्या शरीरात जमा होत असून त्याचा परिणाम कॅन्सरसारखे रोग व्यक्तीला जडत आहेत. औद्योगिक कारखान्यांमधून निघणारा हानिकारक धूर नैसर्गिक हवा प्रदूषित करतो, त्याचप्रमाणे अशुद्ध पाणी नदी-नाल्यांमध्ये सोडल्यामुळे पाणी प्रदूषणाचीसमस्या देखील निर्माण झाली आहे.

**उपाययोजना :**

यावर उपाय म्हणून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी परिसर स्वच्छ ठेवणे आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सामुदायिक स्वच्छता अभियाने राबवणे, कचरा व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करणे आणि प्रदूषणाचे स्रोत कमी करणे हे आवश्यक आहे. लोकांना पर्यावरणाविषयी जागरूक करणे आणि त्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे हे देखील महत्त्वाचे आहे.

**निष्कर्ष :**

पर्यावरण समतोल राखण्यासाठी स्वच्छतेबरोबर पर्यावरण संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानामुळे नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. वृक्षतोडीवर शासनाने कठोर कायदे केले पाहिजेत. यासोबतच, पर्यावरण स्वच्छ ठेवून तापमान बदलावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे, कारण यावरच मानवाचे आणि इतर सजीवांचे अस्तित्व अवलंबूनआहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९७६), मराठी विश्वकोश खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
2. महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी (२००४), ग्रामगीता. सुदामजी सावरकर, चंद्रपूर
3. गांधी, महात्मा (१९९७), माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड
4. https://www.uprpsp.com